# नवी मुंबई महानगरपालिका

## स्थायी समिती

स्थायी समितीच्या **दिनांक ०२ नोव्हेंबर २०११ रोजी भरलेल्या** सभेतील **मंजूर /नामंजूर** इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालील प्रमाणे आहे:-

**विषय क्र.०१**
**०२ नोव्हेंबर २०११**

पाणी पुरवठा विभाग, संगणक विभाग आणि घनकचरा विभागाचा सन २०१० - ११ च्या चालू लेखा परिक्षण अहवालाबाबत, महापालिका मुख्य लेखा परिक्षकांचे दि.१२/०५/२०११ चे पत्र क्र. नमुंमपा/लेपवि/४५/२०११.

**ठराव क्र.२०१.**

**निर्णयः-** **आयुक्तांकडे अभिप्रायासाठी.**

**विषय क्र.०२**
**०२ नोव्हेंबर २०११**

कोपरखैरणे येथे सनियंत्रित हवा गुणवत्ता तपासणी केंद्र बांधण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.२१/१०/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./२५८२/२०११.

ठराव क्र.२०२.
**०२ नोव्हेंबर २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे. केमट्रॉल इंडस्ट्रीज लि. या एजन्सी बरोबर कोपरखैरणे येथे सनियंत्रण हवा गुणवत्ता तपासणी केंद्र उभारण्यास व तद्नंतर पाच वर्ष देखभाल व दुरुस्तीसह एकुण रु.१,०६,३६,१६३/- इतक्या खर्चाने करार करण्यास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णयः-** **संमत.**

**विषय क्र.०३**
**०२ नोव्हेंबर २०११**

रुपये पाच लाखापेक्षा जास्त परंतु पंचवीस लाखापेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कराराबाबत, आयुक्तांचे दि.२४/१०/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/का.अ.(वि)/१२५३/२०११.

**ठराव क्र.२०३.**

**निर्णयः-** **दफ्तरी दाखल.**

**विषय क्र.०४**
**०२ नोव्हेंबर २०११**

नवी मुंबई महानगरपालिकेस सन २०११-२०१२ सालासाठी पॅथोकेमिकल्स साहित्य पुरवठा करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.२४/१०/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/आरोग्य/६१७३/२०११.

ठराव क्र.२०४.
**०२ नोव्हेंबर २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात परिशिष्ट `क` मध्ये तपशीलवार नमुद केल्याप्रमाणे निविदाकारांकडुन नमुद पॅथोकेमिकल्स साहित्य, नमुद प्रमाण व दरांनुसार एकूण रक्कम रु.१,६४,७३,९१२/- इतक्या खर्चाने संबंधीत एजन्सी सोबत करार करण्यास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णयः-** **संमत.**

**विषय क्र.०५**
**०२ नोव्हेंबर २०११**

वाशी विभागातील एम.टी.एन.एल. इमारत ते सेंट लॉरेन्स शाळेच्या इमारती लगतच्या चॅनल कॉंक्रीटीकरण करून वाहनतळ व्यवस्था करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.२५/१०/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./२६००/२०११.

ठराव क्र.२०५.
**०२ नोव्हेंबर २०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात मे.स्वस्तिक इन्फ्रालॉजीक्स (इं) प्रा.लि. या कंत्राटदाराबरोबर त्यांनी कार्यालयातील अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५०% जास्त दराने एकूण रू.५,०८,६१,२६७/- इतक्या खर्चाने करार करण्यास तसेच नियमानुसार भाववाढी पोटी देय असलेल्या खर्चास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:-** **संमत.**